**पोलीस अधीक्षक कार्यालय,सातारा**
**सातारा तालुका पोलीस ठाणे जि.सातारा**
**फोन नं.०२१६२-२३८६०७**
**Email id-**
**sataratps.satara@mahapolice.gov.in**

---

प्रेसनोट दिनांक ०३/१०/२०२६

**सातारा तालुका पोलीसांचा दोषसिध्दीचा दमदार ठसा ,जिल्हयात सर्वोत्कृष्ट दोषसिध्दीची कामगिरी ०३ आरोपींना जन्मठेप .**

सातारा जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व कोर्ट पैरवी अंमलदार यांना दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणे करीता मा. मा.श्री.निखील पिंगळे सो पोलीस अधीक्षक सातारा, मा श्रीमती वैशाली कडुकर अपर पोलीस अधिक्षक सातारा,मा.श्री.विपुल पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी,सातारा शहर विभाग,यानी सुचना दिल्या होत्या .त्याप्रमाणे सातारा तालुका पोलीस ठाणे मधील गुन्हयाचा तपास केल्यानंतर न्यायालयात दोषसिध्दी होण्यासाठी भक्कम पुरावे सादर करणे आणि प्रभावी न्यायालयीन पैरवी करणे,या दोन्ही आघाडयावर सातारा तालुका पोलीसांनी उल्लेखनिय कामगिरी बजावली आहे. सन २०२६ मध्ये ०८ गुन्हयातील सेशन केस (सत्र न्यायालय ) मध्ये सुनावणी होवुन १६ आरोपींना शिक्षा लागलेली असुन त्यापैकी ०२ गुन्हयातील एकुण ०३ आरोपींना जन्मठेप अशी शिक्षा लागलेली आहे.तसेच मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सो सातारा याचे कोर्टामध्ये सन २०२६ मध्ये ३५ गुन्हयातील ३८ आरोपींना शिक्षा लागलेली आहे.त्यामुळे दोषसिध्दीच्या माध्यमातून गुन्हेगारी विरोधातील कारवाईला अधिक बळ मिळाले आहे. दोषसिध्दीची ही कामगिरी केवळ तपासापुरती मर्यादित न राहता ,तपास अधिकारी ,कोर्ट पैरवी अधिकारी आणि अभियोजन यंत्रणा यांच्यातील प्रभावी समन्वयाचे फलित मानले जात आहे.गुन्हयातील पुरावे योग्य पध्दतीने न्यायालयासमोर मांडणे,साक्षीदारांची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करणे आणि प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणे या बाबींना दोषसिध्दीमध्ये महत्व असते.

सदर सर्वोत्कृष्ट उल्लेखनीय दोषसिध्दी कामगिरी केले बाबत मा. रंजनकुमार शर्मा विशेष पोलीस महानिरीक्षक ,कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर ,मा.श्री.निखील पिंगळे सो पोलीस अधीक्षक सातारा,मा श्रीमती वैशाली कडुकर अपर पोलीस अधिक्षक सातारा ,मा.श्री.विपुल पाटील

उपविभागीय पोलीस अधिकारी,सातारा शहर विभाग,यांच्या हस्ते सातारा तालुका पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी निलेश तांबे पोलीस निरीक्षक ,कोर्ट पैरवी अधिकारी सपोनि सुदर्शन काटकर कोर्ट पैरवी अंमलदार शितल भोसले म.पो.हवा.ब.नं.२१००,तेजा तुपे मपोहवा ब.नं.१३६९ व प्रमोद सोनावले पो.कॉ.ब.नं.२६०३ तसेच प्रॉसिक्युशन स्कॉड चे पीएसआय संजय पाटील व इतर पोलीस कर्मचारी यांना प्रशंसापत्र देऊन गौरव करण्यात आलेला आहे.

प्रति,

सर्व वृत्तपत्र संपादक सातारा